जिल्हा व सत्र न्यायालय, रायगड-अलिबाग

जाहीर सूचना

मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश,रायगड अलिबाग यांचे आदेशान्वये आपणांस कळविण्यात येते की, जिल्हा न्यायालय, रायगड-अलिबाग येथील अभिलेख शाखेतील नकलेचे काम, तसेच प्रशासकीय कामाचे झेरॉक्स कामकाजासाठी बाहय मदतीने (Outsourcing Xerox) झेरॉक्स काढणेकामी सेवा पुरवण्यास इच्छुक असणा-या आस्थापनांनी वार्षिक करार करणेकरिता विहित नमुन्यातील मोहरबंद निविदा/दरपत्रक मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,रायगड अलिबाग या नावांने सिलबंद लखोटयामध्ये दिनांक १५/०५/२०२६ पूर्वी सायंकाळी ५.०० वाजेपर्यत मा. प्रबंधक, जिल्हा न्यायालय,रायगड अलिबाग यांचकडे दरपत्रकाच्या पाकीटावर वरच्या भागात "झेरॉक्स मशीनच्या कंत्राटी कामाचे दरपत्रक" सादर करावीत अथवा समक्ष आणून दयावीत. त्यानंतर प्राप्त निविदाचा/दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

प्राप्त झालेल्या मोहरबंद निविदा/दरपत्रके स्विकारण्याचे किंवा नाकारण्याचे सर्व अधिकार कोणतेही कारण न सांगता, जिल्हा न्यायालय, रायगड अलिबाग यांचेकडे राखुन ठेवण्यात येत आहेत.

प्रबंधक,
जिल्हा न्यायालय,रायगड अलिबाग.

जा.क्र./वित्त/२००५/२०२६
जिल्हा न्यायालय, रायगड-अलिबाग
दि.५/०५/२०२६

प्रत:- १) मा. जिल्हा न्यायालय, रायगड-अलिबाग यांचे नोटीसबोर्डवर प्रसिध्द करणेसाठी
२) मा. जिल्हा न्यायालय, रायगड-अलिबाग यांचे संकेतस्थळावर प्रसिध्द करणेसाठी संगणक शाखा, जिल्हा न्यायालय, रायगड-अलिबाग यांजकडे.